# लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत मूल्यांची सद्यस्थिती - एक अभ्यास

**डॉ. गोपाळ रामराव पवार**
( प्राचार्य ) स्वामी विवेकानंद अध्यापक
महाविद्यालय, उदगीर जि. लातूर.

**भगवान रामकृष्ण केंद्रे**
( संशोधक विद्यार्थी),शिक्षणशास्त्र संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**१.१ सारांश:**

*लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत मूल्यांची सद्यस्थिती एक अभ्यास संदर्भात सदरील संशोधन केलेले असून यात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत मुल्यांचा आढावा घेण्यात आलेला आहे. सदरील संशोधनासाठी लातूर जिल्ह्यातील 480 महाविद्यालयीन विद्यार्थी नमूना म्हणून निवडले असून 'व्यक्तिगत मूल्य चाचणी' हे स्व-निर्मित साधन वापरण्यात आले आहे. तर सांख्यिकीय तंत्र म्हणून टी-टेस्ट या साधनाचा वापर करण्यात आला आहे. प्राप्त माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत मूल्यांमध्ये मुलांच्या तुलनेने मुलींमध्ये जास्त फरक आढळून आला आहे तर विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक मूल्यांमध्ये मुलांच्या तुलनेने मुलींमध्ये जास्त फरक आढळून आला नाही.*

**१.२ प्रस्तावना**

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून जवळजवळ सात दशके पूर्ण झाली आहेत. या कालावधीत आपल्या देशाने शिक्षण, आरोग्य, कृषी, विज्ञान, तंत्रज्ञान, व्यवसाय, व्यापार, खेळ, इत्यादी अनेक क्षेत्रांमध्ये लक्षणीय प्रगती केली आहे. एकविसाव्या शतकामध्ये भारत देश हा एक जागतिक महासत्ता बनण्याच्या तयारीत आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा साक्षरतेचा आलेख पाहिला तर त्यामध्येही खूप प्रगती झालेली आहे . पुरुषांच्या साक्षरतेबरोबरच महिलांचेही साक्षरतेचे प्रमाण वाढले दिसून आहे. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून आम्हीही काही कमी नाही याची जाणीव महिलांनी अनेक क्षेत्रांमध्ये सहभागी होऊन व मोलाची कामगिरी करून हे सिद्ध केले आहे.

जागतिक स्तरावर भारत देशाला एक मानाचे स्थान आहे. याला कारण आहे आपली संस्कृती आणि आपल्या परंपरा. यामुळेच भारत देश हा जगाच्या नकाशावर शोभून दिसतो . हे जरी खरे असले तरी आजही समाजामध्ये खून, बलात्कार, जाळपोळ लूटमार, बॉम्बस्फोट, चोऱ्या, धूम्रपान, गर्भपात, नशापान, अंधश्रद्धा इत्यादी प्रकारच्या घटनाही दैनंदिन जीवनामध्ये पाहायला मिळतात. आता मनामध्ये असा प्रश्न निर्माण होतो की एकीकडे माणूस चंद्रावर जातो आहे; मंगळावर वस्ती करू पाहत आहे. तर मग या घटना घडतातच कशा ? याला जबाबदार कोण ? असे आपल्याला वाटल्याशिवाय राहणार नाही. आता कुठे गेली आपली संस्कृती, कुठे गेले आपले संस्कार. या बाबींचा शोध घेणे आपल्याला क्रमप्राप्त ठरते.

वरील सर्व गोष्टींचा जेव्हा आपण सांगोपांग विचार करतो तेव्हा आपणास असे दिसून येते की, विज्ञान व तंत्रज्ञानाचा चुकीच्या पद्धतीने झालेला वापर, माणसाची स्वार्थी वृत्ती, पुरुषप्रधान संस्कृतीचा पगडा, धार्मिक, जातीय, भाषीय संघर्ष, प्रांतवाद, इत्यादी कारणांमुळे या समाजविघातक घटना घडतात. यामध्ये सहभागी असलेली किंवा याला जबाबदार असलेली व्यक्ती कोण ? याचा जेव्हा आपण शोध घेतो तेव्हा आपल्याला जाणवते की यामध्ये सुशिक्षित व तरुण पिढी बऱ्याच प्रमाणात गुंतलेली दिसून येते . मग असे का ? याचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा असे लक्षात येते की, कोणत्याही गोष्टीचे जसे फायदे असतात तसेच तोटेही असतात. आपण आपल्या घरामध्ये अनेक प्रकारच्या भौतिक सुविधांचा वापर करतो. त्यांचा मर्यादित वापर हा आपल्या फायद्याचा असतो आणि अतिरेकी वापर हा नुकसानदायक ठरतो.

अनेक उच्चशिक्षित तरुणांकडून समाजविघातक कारवाया होताना आपण पाहतो. तेव्हा आपल्याला असे दिसून येते की, या युवकांना लागलेल्या वाईट सवयी, वाईट लोकांची संगत,

मूल्य संस्काराचा अभाव, भौतिक साधनांचा चुकीचा व अतिरेकी वापर यामुळे ही पिढी वाईट गोष्टींकडे ओढल्या जात आहे व अशा घटना घडत आहेत. तेव्हा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना होणारे संस्कार, त्यांना लागणाऱ्या बऱ्या वाईट सवयी, त्यांच्यात होणारी मूल्येनिर्मिती यांचा अभ्यास करावा असे संशोधकाला वाटल्याने प्रस्तुत विषयाची संशोधनासाठी निवड केली आहे.

१.३ व्यक्तिगत मूल्ये :

माणूस हा समाजशील प्राणी आहे. तो समाजातच जन्मतो, समाजातच वाढतो. समाजातच त्याच्यावर संस्कार होत असतात. समाजातच त्याच्यामध्ये मूल्यांची रुजवणूक होत असते. त्यासाठी समाज सुद्धा सुसंस्कारीत, मूल्याधिष्ठित असणे तेवढेच गरजेचे आहे. माणसाचा विकास म्हणजे समाजाचा विकास आणि समाजाचा विकास म्हणजे पर्यायाने राष्ट्राचा विकास होय. यावरून आपल्याला मानवी जीवनातील मूल्यांचे महत्व लक्षात येते. मानवी जीवनातून मूल्ये जर वजा केली तर मानवी जीवनाला काहीच अर्थ उरत नाही. म्हणून राष्ट्राचा विकास व्हावा असे वाटत असेल तर समाजावर मूल्यांचे संस्कार होणे अत्यंत गरजेचे आहे. मानवी जीवनाच्या कोणत्याही क्षेत्राचा आपण विचार केला तर मूल्यांशिवाय त्याची किंमत शून्य होते. म्हणून मूल्ये ही मानवी जीवनाचा एक अविभाज्य भाग आहेत.

**१.४ समस्या विधान**

लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत मुल्यांची सद्यस्थिती - एक अभ्यास

**१.५ संशोधनाची उद्दिष्टे**

1. लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील व्यक्तिगत मूल्यांचा शोध घेणे.
2. लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील व्यक्तिगत मूल्यांचा अभ्यास करणे.

**१.६ शून्य परिकल्पना (टी टेस्ट; मुले आणि मुली)**

1. लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयीन विध्यार्थांच्या व्यक्तिगत मूल्यांमध्ये सार्थ फरक आढळत नाही.
2. लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक मूल्यांमध्ये सार्थ फरक आढळत नाही.

**१.७ संशोधन पद्धतीची निवड:**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने 'सर्वेक्षण' या संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. नमुना न्यादर्श निवडी साठी सहेतुक नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.

**१.८ संशोधन साधन :**

सदरील संशोधनासाठी व्यक्तिगत मूल्ये ही चाचणी संशोधकाने स्व निर्मित केलेली असून त्यांची पूर्व आणि उत्तर चाचणी मार्फत विश्वसनीयता ०.९८ आलेली आहे.

| अ. क्र. | संशोधन उदिष्टे | संशोधन साधन | विधाने | विश्लेषण साधन |
|---|---|---|---|---|
| १. | व्यक्तिगत मूल्ये | स्वनिर्मित प्रमाणित कसोटी | ४० | टी मूल्य |

**१.८ संशोधन जनसंख्या व न्यादर्श :**

| अ.क्र. | घटक | जनसंख्या | न्यादर्श | निश्चित न्यादर्श | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | हाविद्यालयीन विद्यार्थी | ३५०० | ५०० | ४८० | १३.७१ % |

**१.९ संशोधनाच्या मर्यादा :**

1. सदरील संशोधन हे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठापुरते मर्यादित आहे.
2. सदरील संशोधन हे लातूर जिल्हयामधील महाविद्यालयापुरते मर्यादित आहे.

**१.१० संशोधनाची गरज :**

मानवी जीवनात त्याच्या सकारात्मक दृष्टिकोनाला खूप महत्त्व आहे. जीवनात पावलोपावली अनेक अडचणी, संकटे, येतात. अनेक आव्हानांना माणसाला सामोरे जावे लागते. तेव्हा या सर्वांना धीराने तोंड देण्याचे धाडस जर माणसांमध्ये असेल तर तो हे सर्व सहजपणे पार करू शकतो. अन्यथा माणूस कोलमडून जाऊ शकतो. कवी गुरु ठाकूर यांच्या शब्दात सांगायचे झाल्यास-

"असे जगावे, छाताडावर आव्हानाचे लावुन अत्तर
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर"

एवढा आत्मविश्वास बाळगून जगण्याला एक प्रकारचे नैतिक बळ लागते. ते विद्यार्थ्यांना मिळालेल्या संस्कारातून, शिकवणुकीतून, अंगी असलेल्या चांगल्या सवयीमधून प्राप्त होत असते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देणारा कोणी दिशादर्शक भेटला तर आयुष्य सुधारुन जाते. अन्यथा विद्यार्थी अनेक वाम मार्गाचा स्वीकार करतात. म्हणून त्यांच्या चारित्र्याचा योग्य रीतीने विकास होण्यासाठी त्याला योग्य मार्गदर्शनाची गरज

असते. तेव्हा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सवयी कोणकोणत्या ? त्यांच्यामध्ये कोणकोणती व्यक्तिगत मुल्ये विकसित झाली आहेत याचा शोध घ्यावा. त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केल्यास, योग्य प्रकारे जीवनाला दिशा दिल्यास उत्तम नागरिक तयार होतो. यासाठी प्रस्तुत विषयावर संशोधन करणे गरजेचे वाटते.

**१.११ संशोधन विषयाचे महत्त्व :**

मानवाचा विकास हा शारीरिक, मानसिक, भावनिक, बौद्धिक, आर्थिक , सामाजिक अशा अनेक अंगानी होत असतो. हा विकास त्या-त्या क्षेत्रामध्ये अनुकूल वातावरण मिळणे यावर अवलंबून असतो. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे हे वय अतिशय नाजूक वळणावर येऊन ठेपलेले असते. या काळात मिळणाऱ्या संस्कारावर त्याचे पुढचे आयुष्य अवलंबून असते. त्यासाठी त्याची ही गरज पूर्ण होण्यासाठी त्याला सत्संगती, सद्विचारांचे संस्करण अपेक्षित असते. त्याच्या सवयींवर लक्ष ठेवावे लागते. त्याच्या अभ्यास विषयक सवयी कोणकोणत्या आहेत ? अभ्यासेतर सवय कोणकोणत्या आहेत ? आधुनिक तंत्रज्ञानाचा तो कसा व किती वापर करतो ? त्याचा त्याच्या कृतिशीलतेवर काय परिणाम होतो ? कोणत्या अंगाने त्याचा विकास होत आहे. कोणत्या क्षेत्राकडे त्याचा कल विकसित होत आहे ? हे ओळखून योग्य प्रकारे मार्गदर्शन केल्यास त्याचा निश्चित फायदा होतो. तसेच त्याच्यात प्रचंड आत्मविश्वास निर्माण होतो. आत्मविश्वासाच्या बळावर तो यशाची अनेक शिखरे पादाक्रांत करू शकतो.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये या काळात अनेक व्यक्तिगत मूल्यांचाही विकास होत असतो. त्यामध्ये धार्मिक, सामाजिक, लोकशाहीवादी, सौंदर्यात्मक, आर्थिक, ज्ञानात्मक, विलासवादी, ऊर्जाविषयक, कौटुंबिक, आरोग्यविषयक, इत्यादी मूल्यांचा समावेश असू शकतो. या सर्व क्षेत्रांमध्ये योग्य वातावरण मिळाले, योग्य दिशा मिळाली तर विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व चांगल्या प्रकारे विकसित होऊ लागते. तो यशस्वीपणे जीवन जगू शकतो. त्या त्या टप्प्यावर विद्यार्थ्याला अनुकूल वातावरण मिळवून देण्याच्या, योग्य मार्गदर्शन मिळवून देण्याच्या, अडीअडचणी समजून योग्य सवय लावणारी लावण्याच्या, व्यक्तिगत मूल्यांचा विकास करून आत्मविश्वास वाढीस लावण्याच्या दृष्टीने हे संशोधन उपयुक्त व महत्त्वाचे ठरणार आहे.

**१.१२ संशोधनाचे विश्लेषण :**

टेबल क्र. १

शून्य परिकल्पना : लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत मुल्यांमध्ये सार्थ फरक आढळत नाही.

| विद्यार्थी | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | टी टेस्ट |
|---|---|---|---|---|
| मुले | २४० | ६०.२२ | १७.५६ | २.०८* |
| मुली | २४० | ८९.६३ | ११.२१ | |

०.०५ या सार्थकता स्तरावर परिकल्पना तपासण्यात आली.

टेबल क्र. १ हा लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत मूल्ये या मानसिक घटकांचे मध्यमान, प्रमाण विचलन आणि टी मूल्य दर्शविते.

**अर्थ निर्वचन :**

टेबल क्र. १ हा लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत मूल्यासंदर्भात मुलांचे मध्यमान ६०.२२, प्रमाण विचलन १७.५६ असून लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत मूल्यासंदर्भात मुलींचे मध्यमान ८९.६३, प्रमाण विचलन ११.२१ आणि टी मूल्य २.०८* असल्याचे निदर्शनास आले आहे. टी मूल्य हे ०.०५ स्तरावर जास्त असल्याने शून्य परिकल्पनेचा त्याग करण्यात येत आहे.

टेबल क्र. २

शून्य परिकल्पना : लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक मुल्यांमध्ये सार्थ फरक आढळत नाही.

| विद्यार्थी | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | टी टेस्ट |
|---|---|---|---|---|
| मुले | २४० | १.५४ | ०.७० | १.०० |
| मुली | २४० | २.२५ | ०.८२ | |

०.०५ या सार्थकता स्तरावर परिकल्पना तपासण्यात आली.

टेबल क्र. १.८ हा लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक मूल्य या मानसिक घटकांचे मध्यमान, प्रमाण विचलन आणि टी मूल्य दर्शविते.

**अर्थ निर्वचन :**

टेबल क्र. १.८ हा लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक मूल्यासंदर्भात मुलांचे मध्यमान १.५४, प्रमाण विचलन ०.७० असून लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयीन

विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक मूल्यासंदर्भात मुलींचे मध्यमान २.२५, प्रमाण विचलन ०.८२ आणि टी मूल्य १.०० असल्याचे निदर्शनास आले आहे. टी मूल्य हे ०.०५ स्तरावर कमी असल्याने शून्य परिकल्पनेचा स्वीकार करण्यात येत आहे.

**१.१३ संशोधन निष्कर्ष :**

१. टेबल क्र. १ वरून असे दिसून येते कि लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत मूल्यांमध्ये मुलांच्या तुलनेने मुलीमध्ये जास्त फरक आढळून आला आहे.

२. टेबल क्र. १.८ वरून असे दिसून येते कि लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक मूल्यांमध्ये मुलांच्या तुलनेने मुलीमध्ये जास्त फरक आढळून आला नाही.

१.१४ शून्य परिकल्पना (विश्लेषण तंत्र : टी टेस्ट)

(०.०५ सार्थकता स्तरावर ताज्य ठरलेल्या शून्य परिकल्पना "* " या चिन्हाने दर्शविल्या आहेत.)

| परिकल्पना क्र. | शून्य परिकल्पना (सार्थकता स्तर ०.०५) | तंत्र / निर्णय |
|---|---|---|
| १. | लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयीन विध्यार्थांच्या व्यक्तिगत मूल्यांमध्ये सार्थ फरक आढळत नाही. | t - मूल्य = (२.०८) त्याग |
| २. | लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक मूल्यांमध्ये सार्थ फरक आढळत नाही. | t - मूल्य = (१.००) स्वीकार |

**१.१५ संशोधन शिफारशी :**

1. टेबल क्र. १ नुसार लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत मूल्यांमध्ये मुलांना व्यक्तिगत मूल्ये रुजवणुकीसाठी प्रयत्न करावेत.
2. टेबल क्र. २ नुसार लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक मूल्यांमध्ये मुलींना कौटुंबिक मूल्य वाढविण्यासाठी एकत्र कुटुंब पद्धतीचा स्वीकार करावा.

**१.१६ संशोधन संदर्भ :**

१) उपासनी, ना. के., (१९९६ ), नवे शैक्षणिक मूल्यमापन आणि संख्याशास्त्र, श्री विद्या प्रकाशन पुणे.

२ ) दांडेकर, वा. ना., (१९९४ ), शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र, श्री विद्या प्रकाशन पुणे.

३) घोरमोडे, के. यू. आणि घोरमोडे, कलाकृष्णा, (२००८), शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे, विद्या प्रकाशन नागपूर.

४) भिंताडे, डॉ. वि. रा., (१९८८), शैक्षणिक संशोधन, नूतन प्रकाशन, पुणे.

५) श्रोत्री, निशिकांत, (१९८४), स्त्री आणि आरोग्य, स्वाती प्रकाशन, पुणे.